# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

नागपूर विभाग शासकीय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर

दुरध्वनी क्र. २५६५१४३ | फॅक्स क्र. ०७१२—२५६१६६३

E-mail : ronagpur.dte@gmail.com | Website : rdtenagpur.org.in

अतितात्काळ | क्रमांक : तंशिस/प्राकाना/शै.वि/इ.बी.सी/२०१४/ 3571

कालमर्यादित | दिनांक : 25 NOV 2014

प्रति,

———————————

———————————

———————————

(सर्व अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र पदवी व पदविका संस्था, एमबीए / एमसीए पदव्युत्तर पदवी, हॉटेल मॅनेजमेंट पदवी / पदवीका संस्था)

विषय:— **खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षण संस्थेतील व्यावसायीक अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्टया मागास विद्यार्थ्यांच्या ५० टक्के शैक्ष. शुल्क प्रतिपुर्तीचे ऑनलाईन पध्दतीने भरेलेले अर्ज जमा करण्याबाबत शैक्षणिक वर्ष २०१४—१५**

संदर्भ:— या कार्यालयाचे पत्र क्र. तंशिस/प्राकाना/शै.वि/इ.बी.सी/२०१४/३४८८, दि. १८/११/२०१४

शैक्षणिक वर्ष २०१४—१५ करीता आर्थिकदृष्टया मागास विद्यार्थ्यांच्या ५० टक्के शैक्षणिक शुल्क प्रतिपुर्तीची योजना मागिल वर्षाप्रमाणे यावर्षीसुध्दा ऑनलाईन पध्दतीने राबविण्यात येत आहे. सदर ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरण्याची अंतिम दिनांक २०/११/२०१४ ठरलेली आहे. सदर ऑनलाईन भरलेले अर्ज संस्थेच्या लॉगिनमधून Approval करण्याची अंतिम दिनांक ३०/११/२०१४ ठरविण्यात आल्याबद्दल संदर्भिय पत्रान्वये कळविण्यात आले होते.

करीता या पत्राव्दारे आपणास कळविण्यात येते की, फक्त पात्र विद्यार्थ्यांचेच Approval केलेले अर्ज दिनांक **०१/१२/२०१४ ते १२/१२/२०१४** पर्यंत खास प्रतिनिधीमार्फत खालील मुददयांप्रमाणे तपासणी करुन या कार्यालयास सादर करावे.

१. अर्ज या कार्यालयात सादर करतेवेळी ज्या विद्यार्थ्यांना शै.वर्ष २०१३—१४ मध्ये ऑनलाईन पध्दतीने मंजूर झालेले आहेत त्या विद्यार्थ्यांचे अर्ज जमा करतांना त्यांच्या अर्जावर उजव्या कोप—यात **लाल शाईने Renewal** असे लिहावे व असे सर्व अर्ज वेगळे व इतर नविन भरलेले अर्ज वेगळे या प्रकारे जमा करावेत.

२. ऑनलाईन पध्दतीने भरलेले अर्ज व त्यासोबत अर्जामध्ये दिलेले प्रमाणपत्र (जसे Admission Confrmation Letter, वर्ष २०१३—१४ चे सक्षम अधिका—यांनी दिलेला कुटुंब प्रमुखाचा उत्पन्नाचा दाखला रु. १ लक्ष व त्या आत असलेला, मागिल वर्ष पास/एटीकेटी ची मार्कशिट, अधिवासी प्रमाणपत्र, राशन कार्ड व अर्जामध्ये नमुद केलेले इतर आवश्यक प्रमाणपत्र)

३. **संस्थेने त्यांच्या ईबीसी लॉगिन मध्ये असलेला मॅसेज बॉक्स दररोज तपासून पहावा. यापुढे त्या मॅसेज बॉक्सव्दारेच तुम्हाला सुचना देण्यात येईल याची नोंद घ्यावी.**

४. जे अर्ज Fill New Application Form मधून भरलेले आहे. त्यांच्या अर्जासोबत Admission Conformation Letter जोडणे अनिवार्य आहे. व अश्या अर्जाची स्वतंत्र यादी सुध्दा सादर करावी.

५. जे विद्यार्थी अभियांत्रिकी पदवीका अभ्यासक्रमात १२ वी नंतर प्रवेशित आहेत त्या विद्यार्थ्यांकडून ११वी व १२वी कोणती सवलत घेतलेली आहे त्याबाबतचे संबंधीत शाळा/महाविद्यालयाचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

६. कुटुंब प्रमुखाचा उत्पन्नाचा दाखला सक्षम अधिकारी जसे तहसिलदार, नायब तहसिलदार, एसडीओ यांचे असणे आवश्यक आहे.

७. आपल्या संस्थेच्या अर्जासोबत शैक्षणिक वर्ष २०१४—१५ चे हमिपत्र (इबीसी व्यतिरिक्त अन्य कुठलिही सवलत घेतलेली नाही याबाबतचे) सादर करावे. सदर हमिपत्राचा नमुदा या कार्यालयाच्या संकेतस्थळावर (www.rdtenagpur.org.in Dt. 7/05/2013) उपलब्ध आहे.

८. प्रस्तावासोबत आपल्या संस्थेच्या बॅक खात्याची बिनचुक माहिती विहित नमुन्यात स्वाक्षरी करुन व बॅकेव्दारे प्रमाणित करुन सोबत जोडावी. तसेच ईबीसी संकेतस्थळावर सुध्दा अपडेट करावी.

९. फक्त ऑनलाईन पध्दतीने भरलेले अर्जच सादर करावे.

१०. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या **अर्जासोबतची सर्व कागदपत्रे सांक्षाकित असणे आवश्यक आहे**. नसल्यास सदर अर्ज रद्द करण्यात येईल.

**वरील बाबींची पुर्तता सर्व विद्यार्थ्यांनी केली असल्याबाबतची खात्री करुन व संस्थास्तरावरच अर्जाची छाननी करुन फक्त ऑनलाईन भरलेले अर्जच या कार्यालयास सादर करावे. अपात्र विद्यार्थ्यांचे अर्ज या कार्यालयास सादर करु नये. प्रत्येक विद्यार्थ्याच्या अर्जावर प्राचार्यांची स्वाक्षरी असणे आवश्यक आहे. अन्यथा आपले संस्थेचे अर्ज तपासणी केले जाणार नाही.**

**(गुलाबराव ठाकरे)**
सहसंचालक
तंत्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, नागपूर.

प्रत:— प्रोग्रामर, हेच कार्यालय यांना वेबसाईडवर अपलोड करण्याकरीता